# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

सूचना

क्रमांक: २अ/एडीएम/२०१७/ ५e३
दिनांक : 13 JUN 2017

विषय : व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेअंतर्गत कागदपत्र पडताळणी आणि अर्ज निश्चिती करताना कागदपत्रांच्या छायाप्रती न घेणेबाबत....

संदर्भ : शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रसुधा १६१४/३४५/ प्र.क्र.७१/ १८-अ, दिनांक ९.३.२०१५

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील विवीध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी कागदपत्र पडताळणी आणि अर्ज निश्चिती अभ्यासक्रमनिहाय निर्धारीत केलेल्या सुविधा केंद्रांवर सुरू आहे. कागदपत्र पडताळणी आणि अर्ज निश्चिती केल्यानंतर काही सुविधा केंद्रांकडून उमेदवारांना कागदपत्रांच्या छायाप्रती (Photocopy) व त्या राजपत्रित अधिका-याकडून साक्षांकित करून जोडण्याची मागणी होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

या अनुषंगाने सर्व अभ्यासक्रमाच्या सुविधा केंद्रांना कळविण्यात येते की, कागदपत्र पडताळणी करताना उमेदवारांकडून कोणत्याही कागदपत्रांच्या छायाप्रतींची मागणी करण्यात येऊ नये किंवा छायाप्रती काढण्यास किंवा त्या छायाप्रतींचे साक्षांकन करून सादर करण्यासाठी उमेदवारांना भाग पाडू नये. तथापि काही कागदपत्रे ऑनलाईन पध्दतीने प्रिंट आऊट काढून सादर करण्याच्या प्रकरणी (उदा.MHT CET marksheet, JEE (Main) Marksheet, E Aadhar No. इ.कागदपत्रे) पडताळणीसाठी उमेदवारांनी सादर केल्यानंतर उमेदवाराने **स्वयंसाक्षांकित** केलेल्या प्रती पडताळणीसाठी विचारात घेण्यात याव्यात.

**(चंद्रशेखर ओक,** भा.प्र.से**)**
संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

E:\Budage\२०१७-१८\General Correspondence\attestation not compulsory notice.docx